पालघर येथील १०१-११-० हे.आर.जमीन सिडको या प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यासाठी महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पसंपा- २०१९/प्र.क्र.९१ /पदुम-१०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३१ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र. प्राफेब-२०१५/प्र.क्र.७७ (अ)/म-१०, दि.२९ जून,२०१६
२) शासन निर्णय क्र. पसंपा-२०१५/प्र.क्र.२२५/पदुम-१०, दि.९ सप्टेंबर, २०१६
३) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र. प्राफेब-२०१५/प्र.क्र.७७ (अ)/म-१०, दिनांक-२१ सप्टेंबर, २०१६

प्रस्तावना:-

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये नविन पालघर जिल्हा मुख्यालय व पालघर नवनगर उभारण्याकामी पालघर तालुक्यातील मौजे पालघर, कोळगांव, मोरेकुरण, नंडोरे, दापोली, टेंभाडे व शिरगांव या ७ गावात उपलब्ध असलेली सुमारे एकूण ४४०-५७.९० हे.आर. इतकी शासकीय जमीन कृषि , पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील जमीन वर्ग करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये सिडको लि. नवी मुंबई यांचे मार्फत नवनिर्मीत पालघर जिल्हा मुख्यालय व पालघर नवनगर विकसीत करण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिपत्याखाली ४४०-५७.९० हे.आर इतकी जमीन महसुल विभागास प्रत्यार्पित करण्यात आली आहे. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाने सदर शासन निर्णयाच्या सहपत्र अ मध्ये दर्शविलेली एकूण ४४०-५७.९० हे.आर.इतकी शासकीय जमीन सिडको लि. नवी मुंबई यांच्याकडे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ११३ A अन्वये विनामुल्य वर्ग करण्यास मान्यता दिली आहे.

महसुल व वन विभागाने या विभागास असे कळविले आहे की, पालघर ,नवघर मुख्यालय इमारत बांधकाम प्रगती संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३/३/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत जिल्हा मुख्यालयांतर्गत बांधण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय शासकीय इमारतीमधील अंतर्गत सजावट व फर्नीचरची कामे सिडको लि. यांचेमार्फत करण्याबाबत तसेच त्याबदल्यात मौजे केळवेरोड ता.पालघर येथील १०१-११-० हे.आर जमीन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून सदरहू जमीनीची सिडकोकडून पाहणी करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. सदर सूचनेनुसार महसुल व वन विभागाने प्रस्तावाची तपासणी करुन मौजे केळवेरोड ता.पालघर येथील १०१-११-० हे.आर. जमीन प्रत्यार्पित करण्यात यावी अशी विनंती दुग्धव्यवसाय विभागास केली आहे. महसुल व वन विभागाने केलेल्या विनंतीनुसार सदर जमीन प्रत्यार्पित करण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन या निर्णयान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांनी चौकशी केल्यानुसार, दुग्धव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील केळवेरोड ता.पालघर येथील खालीलप्रमाणे उपलब्ध असलेल्या जमीनीपैकी १०१-११-० हे.आर.जमीन महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास मान्यता देत आहे.

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र	७/१२ मध्ये कब्जेदाराचे नांव
१	९	३.८०.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
२.	४६२	५.९४.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
३.	४६६	७.९९.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
४.	४६७	६.६६.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.

५.	५२०	१३.९८.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
६.	५२१	८.८५.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
७.	५२२	७.८२.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
८.	६५०	८.५०.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
९.	६५२/अ	७.१३.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
१०.	६७२	८.०१.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
११.	७१६	१२.७१.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
१२.	८७१	७.१६.०	डेअरी डेव्हलपमेंट डिपार्टमेंट
१३.	१३३९	०.३२.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
१४.	१३४५	३.४५.०	मे.मिल्क कमिशन सो.मुंबई.
एकूण		१०२.३२.० हे.आर	

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८३११४०५१५१८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNALI ARUN CHAVAN

Digitally signed by SWAPNALI ARUN CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=50635cec7caef92c815ed8a336874eaf0788426761b958eda8d0acf1db4ef418, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBA, serialNumber=b8d3da23fcbe7b0e267e6caa12b1dc99b45a9b0b73bbec9e7560d40c354f06d3, ou=AGRICULTURE DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNALI ARUN CHAVAN
Date: 2019.08.31 14:11:36 +05'30'

(स्व. अ. चव्हाण)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-१. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४ .अपर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६.व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
७. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८
८.जिल्हाधिकारी, जिल्हा पालघर.
९. निवडनस्ती (कार्यासन -पदुम-१०).